# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २०२-२२** **दिनांक ०५/०७/२०२२**

## १०,५००/रु किंमतीचा गांजा बाळगणा-यास मालासह अटक-वालीव पोलीस स्टेशनची कारवाई.

दिनांक ०३/०७/२०२२ रोजी २३.२० वा चे सुमारास वालीव पोलीस ठाणे हद्दीतील मथुरा हॉटेलचे पाठिमागे, कामण, वसई पुर्व ता. वसई येथे दिपक सिंग नावाचा इसम गांजा घेवून येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली होती. मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वालीव पोलीस स्टेशनच्या पथकाने सदर ठिकाणी दोन पंचांसह छापा टाकला असता एक इसम मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून त्याचे नाव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नावे दिपक आद्यप्रसाद सिंग वय-३२ वर्षे रा. रोहीत यादव यांची रुम, माळी कंम्पाऊंड, मथुरा हॉटेलचे पाठिमागे, कामण, वसई पुर्व ता. वसई जि. पालघर मुळ रा. ग्राम - शहाबुद्दीनपुर, पोस्ट-शहाबुद्दीनपुर तहसिल- कादीपुर, जिला-सुलतानपुर, राज्य- उत्तरप्रदेश असे असल्याचे सांगितले. त्याची दोन पंचांसमक्ष अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यात १०,०००/- रुपये किंमतीचा हिरवट रंगाचा व उग्र वास असलेला १ किलो २८८ ग्रॅम वजनाचा मिळून आलेला गांजा हा अंमली पदार्थ व भारतीय चलनातील १०० दराच्या ५ नोटा असे एकूण १०,५००/- किंमतीचा मुद्देमाल मिळून आल्याने जप्त करण्यात आलेला आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने वालीव पो स्टे गुरनं ६५४/२०२२ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोवैद्यानिक परिणाम करणारे पादार्थ अधिनियम १९८५ (एनडीपीएस ॲक्ट) कलम ८(क), २० (ब) ii (अ) प्रमाणे प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढिल तपास पोउपनि/श्री प्रशांत चव्हाण हे करीत आहेत.

सदर कामगिरी श्री संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाठ, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस स्टेशनचे श्री. राहुलकुमार पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री मिलिंद सांबळे, पोलीस निरीक्षक (प्रशासन), पोउपनिरी/प्रशांत चव्हाण, पोउपनिरी/ राजेद्र साबळे, पोलीस अंमलदार/०६०७६ महेश बोडके, पोलीस अंमलदार/१३१२८ सातपुते, पोलीस अंमलदार/१४०४० बोडके यांनी पार पाडली आहे.